VNPS.12/2000-2001 90800

जा.क्र.माध्य-3/प्रथम मान्यता/पुवि/ 3/13 2000
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १. यांचे कार्यालय,
दिनांक :- 22 AUG 2000

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे.

विषय :- प्रथम मान्यता
जिज्ञासा प्रबोधन, बिबवेवाडी, पुणे-३७

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/६-४/प्र.मा./९९-२००० दिनांक ८.२.२०००.

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२,३.३ अन्वये जिज्ञासा प्रबोधन, बिबवेवाडी, पुणे-३७ संस्थेच्या पे. पो. ट्रस्टचे विद्यानिकेतन, इं. मि. स्कूल. माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/ ~~९ वी १० वी~~ च्या वर्गास १९९८-/१९९९ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९८ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] ~~यांनी खालील अटींची पूर्तता~~ शाळा करीत आहे किंवा कसे यांची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे या बाबतही अहवाल प्रस्तावा-सोबत पाठविण्यात यावा.

1] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
2] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
3] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन द्यावी.
4] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
5] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
6] पुरेसा प्रशिक्षीत शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
7] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
8] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
9] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
10] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
11] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
12] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
13] पुरेशी विद्यार्थी संख्या असावी.
14] कर्मचाऱ्यांची सेवा नोंद पुस्तके ठेवावीत.
15]

मूळप्रतिवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १.

प्रत- मुख्याध्यापक पे. पो. ट्रस्ट चे विद्यानिकेतन इं. मि. स्कूल, बिबवेवाडी, पुणे-३७